मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 2 लाखांहून अधिक मुलांचे 'जेई' लसीकरण!

## महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाची लसीकरण मोहीम होत आहे यशस्वी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या अंतर्गत सुरू असलेल्या जापनीज मेंदूज्वर (जेई) प्रतिबंधक लस मोहिमेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत शहरातील दोन लाखांहून अधिक बालकांना ही लस देण्यात आली आहे. शहरात हे लसीकरण अभियान यशस्वीपणे राबवण्यात येत असून जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

शहरातील आरोग्य केंद्रे, शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये ही प्रभावी लसीकरण मोहीम सुरू आहे. या मोहिमेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय. संपूर्ण शहरात राबवण्यात येत असलेल्या या मोहिमेत २५ मार्च २०२५ पर्यंत २ लाख ७ हजारांहून अधिक बालकांचे जेई लसीकरण करण्यात आले आहे.





> बालकांचे आरोग्य ही आपल्या शहरासाठी प्राथमिकता आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका त्यामुळेच जेई लसीकरण मोहीम व्यापक स्वरूपात राबवत आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी पालक, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्था यांचे उत्तम सहकार्य मिळत आहे. भविष्यातही आरोग्य क्षेत्रात अशी परिणामकारक पावले उचलण्याचे नियोजन आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> जापनीज मेंदूज्वर ही लस यापूर्वी घेतली असली तरी सध्या सुरू असलेल्या लसीकरण मोहिमेअंतर्गत ती पुन्हा घेणे आवश्यक आहे. जेणेकरून रोगप्रतिकारशक्ती वाढेल आणि या आजाराचा प्रसार रोखता येईल. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांचे लसीकरण करून घ्यावे.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

**रुग्णालयाचे नाव : लसीकरण झालेल्या बालकांची संख्या**

आकुर्डी रुग्णालय : ३० हजार ९९७

भोसरी रुग्णालय : ३६ हजार ६७९

जिजामाता रुग्णालय : ३१ हजार ६४०

सांगवी रुग्णालय : २२ हजार ११८

तालेरा रुग्णालय : २३ हजार २१२

थेरगाव रुग्णालय : १६ हजार ७३०

यमुनानगर रुग्णालय : ३८ हजार २४

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय : ८ हजार १६०

---

# बंद प्राणिसंग्रहालयातील सर्पांसाठी नऊ लाखांचे उंदीर

## चिंचवड येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय आठ वर्षांपासून बंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे संभाजीनगर, चिंचवड येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय हे विविध कारणांमुळे वादात सापडले आहे. कामातील कासवगतीमुळे हे प्राणिसंग्रहालय राज्यभरात गाजत आहे. त्यात या आठ वर्षांपासून बंद असलेल्या प्राणिसंग्रहालयातील सर्पांसाठी पांढरे उंदीर खरेदी करण्यात येत आहेत. त्यासाठी तब्बल 9 लाख रुपयांचा खर्च करण्यात येत आहे.

गेल्या आठ वर्षांपासून या प्राणिसंग्रहालयास टाळे आहे. त्यामुळे प्राणिसंग्रहालय नागरिकांसाठी बंद आहे. प्राणिसंग्रहालय नूतनीकरण आणि सुशोभीकरणाचे काम 2017 पासून सुरू आहे. तब्बल 20 कोटी रुपयांचा खर्च करूनही कासव गतीने काम सुरू असल्याने काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे त्या कामात गैरव्यवहार झाल्याचा आरोप राज्याच्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात करण्यात आला होता.

आता नव्याने 24 कोटींचा खर्च करण्यात येत आहे. त्या खर्चास गेल्या स्थायी समिती सभेत मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी प्राणिसंग्रहालय आणखी दीड वर्षे बंद राहणार आहे.





असे असताना तेथील सर्पांसाठी महापालिकेने पशुवैद्यकीय विभागाने पांढरे उंदीर खरेदी केले आहेत.

त्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने निविदा काढली होती. त्यात 3 पुरवठादारांनी निविदा भरली. सॅम एन्टरप्रायजेस या पुरवठादाराने एका पांढऱ्या उंदराचा 168 रुपयांऐवजी 159 रुपये दराने भरलेली लघुत्तम निविदा स्वीकृत करण्यात आली आहे.

या पांढरा उंदराचा आवश्यकतेनुसार दोन वर्षे पुरवठा करण्यात येणार आहे. त्यासाठी एकूण 8 लाख 61 हजार 840 रुपये खर्च केला जाणार आहे. पांढरे उंदीर हे खाण्यायोग्य व निश्चित केलेल्या वजनाचे असावेत. त्याचा नियमितपणे पुरवठा करावा, असे बंधन पुरवठादारावर असणार आहे. पांढरे उंदीर खरेदीच्या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

### प्राणिसंग्रहालयाची सद्य:स्थिती

- एकूण 52 सर्प
- आठवड्यातून एक किंवा दोन उंदीर खाद्य
- एक पांढरा उंदीर 159 रुपयांना
- दोन वर्षे उंदीर पुरवठा
- एकूण खर्च 8 लाख 61 हजार 840 रुपये

# दुमजली उड्डाणपुलाचे काम रखडले

## वाहतूक कोंडी फुटण्यास आणखी एक महिना कालावधी लागणार

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील आचार्य आनंदऋषीजी चौकात दुमजली उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्यासाठी आणखी एक महिना कालावधी लागणार आहे. त्यामुळे नियोजित वेळेत ३१ मार्चपूर्वी उड्डाणपुलाचे काम काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. त्यामुळे औंध, बाणेर, पाषाण, बालेवाडीच्या दिशेने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना आणखी एक महिना (एप्रिल) वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेचे काम 'पीएमआरडीए'ने हाती घेतले आहे. या प्रकल्पासाठी विद्यापीठासमोरील आनंदऋषीजी चौकातील उड्डाणपूल २०२० मध्ये पाडण्यात आला.

त्या ठिकाणी दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येत आहे. हे काम जानेवारी २०२४ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना 'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण'च्या (पुम्टा) बैठकीत देण्यात आल्या होत्या. मात्र, चौकातील सेवावाहिन्या स्थलांतर करण्याचे काम महापालिकेकडून वेळेत पूर्ण झाले नाही. तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. म्हणून वाहतूक पोलिसांनी गणेशखिंड रस्त्यावर सुरक्षा (बॅरिकेडिंग) करण्यास 'पीएमआरडीए'ला परवानगी दिली नव्हती. त्यामुळे या चौकातील काम सुरू होण्यास विलंब झाला.

गणेशखिंड रस्त्यावरील 'ई-स्क्वेअर' येथून हा पूल सुरू होतो. पुलासाठी ४२ खांब उभारण्यात येणार आहेत. मुख्य चौकात खांब उभारल्यास वाहतुकीला अडथळा निर्माण होईल म्हणून मुख्य चौकात एकही खांब न उभारता दोन खांबांमध्ये ५५ मीटर लांबीचे आणि सुमारे १८ ते २० मीटर रुंदीचे 'स्पॅन' टाकण्याचे प्रस्तावित आहे.

उड्डाणपुलाचे काम २०२३ मध्ये सुरू झाल्यानंतर जानेवारी २०२४, त्यानंतर ऑगस्ट आणि त्यानंतर नोव्हेंबरची मुदत देण्यात आली आणि त्यानंतर ३१ मार्च २०२५ ही मुदत देण्यात आली होती. मात्र, या मुदतीमध्येही काम पूर्ण झालेले नाही.

उड्डाणपुलाची एक बाजू महिनाभरानंतर सुरू झाल्यास येथून दररोज ये-जा करणाऱ्या पुणेकरांची वाहतूक समस्येतून काही प्रमाणात सुटका होण्याची शक्यता आहे.

> “ उड्डाणपुलाचे काम मार्चअखेरपर्यंत पूर्ण करून तो वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत 'पीएमआरडीए'चे उद्दिष्ट होते. मात्र, किरकोळ कामे प्रलंबित आहेत. एप्रिल महिना अखेरपर्यंत उड्डाणपुलाची एक बाजू वाहतुकीसाठी खुली करण्यात येईल.
>
> - रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए.

# पुणे रेल्वे स्थानकात असुविधांचा विळखा

## उन्हाच्या तीव्र झळा, प्रवाशांची गर्दी : प्रवासी त्रस्त, पायाभूत सुविधांचा अभाव

**पुणे | प्रतिनिधी**

उन्हाच्या तीव्र झळा, प्रवाशांची गर्दी, अपुरी आसन व्यवस्था, प्रतीक्षाकक्षात गर्दी, त्यामुळे स्थानकातील फरशीवर रेल्वेच्या प्रतीक्षेत बसलेले प्रवासी, बंद पडलेले शौचालय, बंद असलेली बॅटरीवरची वाहने, सुरू न झालेली उद्वाहन सुविधा आणि त्यामुळे त्रस्त प्रवासी... पुणे रेल्वे स्थानकात सध्या असे चित्र दिसत आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा काळ सुरू होत असल्याने रेल्वे गाड्यांना गर्दी वाढत असताना, त्यात स्थानकावर प्रवाशांना अशा असुविधांचा सामना करावा लागतो आहे.



'लोकसत्ता'च्या प्रतिनिधीने स्थानकावर जाऊन जी स्थिती प्रत्यक्ष पाहिली, त्यातून हे चित्र दिसून आले. पुणे रेल्वे स्थानकावरून लांब पल्ल्याच्या ७२ प्रवासी, तर ८० मालगाड्या गाड्या दररोज धावतात. त्यातून प्रवास करण्यासाठी एक लाखांहून अधिक प्रवासी दिवसभरात स्थानकावर येतात. मात्र, सुविधांची वानवा असल्याचे दिसते.

स्थानकात शिरताना मुळात आधी कोंडीचा सामना करावा लागतो. प्रवेशद्वारातून आत आल्यानंतरही हातात सामान घेऊन चारचाकी, दुचाकी, रिक्षा, विक्रेते यांच्या गर्दीतून वाट काढत फलाटापर्यंत जावे लागते. स्थानकावर ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांच्या सुविधेसाठी असलेली 'विशेष प्रवासी सशुल्क बॅटरी ऑपरेटेड कार' सेवा गेल्या काही महिन्यांपासून बंदच आहे. तसेच, उद्वाहन सुविधाही गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू होण्याच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे एका फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जाण्यासाठी ज्येष्ठ, दिव्यांग आणि महिला प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो.

वातानुकूलित, तसेच अन्य प्रतीक्षा कक्षांत आसनक्षमता कमी असल्याने ते अपुरे पडतात. परिणामी, अनेक प्रवाशांना फलाटांच्या फरशांवर बसून किंवा कोपऱ्यांचा आसरा घेऊन प्रतीक्षा करावी लागते. अनेक प्रवासी फलाटाच्या मधोमध बसत वा झोपत असल्याने अन्य प्रवाशांना त्यांच्या मधून वाट काढत जावे लागते. सर्वच फलाटांवर ही अवस्था दिसते. त्यातच फलाट क्रमांक एकवरील स्वच्छतागृह काम सुरू असल्याने बंद आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे.

> “ रेल्वे बोर्डाच्या मानकानुसार एका फलाटावर किमान ६०० आसने असणे अपेक्षित आहे. सध्या एकूण दोन हजार ७४४ आसने उपलब्ध करून दिली आहेत. नव्याने २०० आसनांसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता, त्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. तसेच, फलाट क्रमांक एकवरील स्वच्छतागृहाच्या पुनर्बांधणीचे काम सुरू असल्याने ते बंद आहे. लवकरच स्वच्छतागृह सुरू करण्यात येईल. बॅटरीवरील कार पादचारी पुलावरील सुरक्षेच्या कारणामुळे बंद ठेवण्यात आल्या आहेत. लवकरच त्या सुरू करण्यात येतील.
>
> – राजेश कुमार वर्मा, व्यवस्थापक, मध्य रेल्वे, पुणे विभाग.

# पाण्याच्या 'ना हरकत'वर धोरणात्मक निर्णय

## पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए आयुक्तांची संयुक्त बैठक पडली पार; एनओसीबाबत एप्रिलमध्ये निघणार आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**


पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रात बांधकाम व्यावसायिकांकडून मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले जात आहेत. मात्र, या गृहप्रकल्पांची उभारणी झाल्यानंतर भविष्यात तेथे राहणाऱ्या नागरिकांना पाणी कुठून उपलब्ध करायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए कार्यक्षेत्रातील बिल्डरांना देण्यात येणाऱ्या पाण्याच्या 'ना हरकत' प्रमाणपत्र (एनओसी) आणि पाणी उपलब्ध होईपर्यंत संबंधित बिल्डरांकडून केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत त्यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या प्रतिज्ञापत्रावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे. येत्या आठ दिवसांत तिन्ही आयुक्तांकडून एकत्रितपणे एकच निर्णय घेवून आदेश काढण्यात येणार आहे.

पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ राजेंद्र भोसले, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह आणि पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे यांची बांधकाम व्यावसायिकांच्या गृहनिर्माण प्रकल्पांना भविष्यात पाणी पुरवठा कसा करायचा, त्यांना पाणी कुठून उपलब्ध करायचे, त्यांना देण्यात येणाऱ्या पाण्याची एनओसी आणि त्यांच्याकडून घेण्यात येणारे प्रतिज्ञापत्रावर ठोस उपाययोजना करण्यात यावी, यासाठीची संयुक्त बैठक पुण्यात १९ मार्चला पार पडली. या बैठकीला पिंपरी-चिंचवड महापालिकेतील पाणी पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यंदाच्या वर्षी पाण्याची तीव्र टंचाई भासण्याची शक्यता असल्याने पिण्याच्या पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन जलसंपदा विभागाकडून केले जात आहे.पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात बांधकाम व्यावसायिकांकडून गृहप्रकल्प उभारले जात आहेत. एकाच ठिकाणी एक ते दोन हजार फ्लॅट तयार करुन मोठमोठे टोलेजंग टॉवर उभारले जात असताना त्यांना भविष्यात पाणी टंचाईलादेखील सामोरे जावे लागत आहे. बांधकाम व्यावसायिकांकडून गृहप्रकल्प उभारुन तो तेथील रहिवाशांची सोसायटी तयार करत हॅन्डओव्हर केला जात आहे. त्यामुळे तेथील गृहप्रकल्पांना महापालिकेकडून पाणी पुरवठा विभागाकडून पाण्याची एनओसी दिल्याने तेथील रहिवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त ठरते. वाढती लोकसंख्या आणि उपलब्ध असलेला धरणातील मंजूर पाणी कोठा विचारात घेता शहरातील नागरिकांना पुरेसा पाणी देणे जिकीरीचे झाले आहे. असे असताना नव्याने तयार होणाऱ्या गृहप्रकल्पांना कसे पाणी द्यायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

संबंधित बांधकाम व्यावसायिकांनी गृहप्रकल्पातील रहिवाशांना सोसायटी तयार करुन दिल्यानंतर पाण्याचे तुमचे तुम्ही बघा, असे सांगून हात झटकून निघून जात आहेत. त्यामुळे मानवतेच्या दृष्टीकोनातून तेथील रहिवाशांना पिण्याचे तरी पाणी देण्यासाठी महापालिकेला प्रयत्न करावा लागत आहे. त्यामुळे जे पाणी उपलब्ध आहे, त्याच पाण्यातून नवीन गृहप्रकल्पांना पाणी देण्याची व्यवस्था करावी लागत आहे.



### बांधकामांना एसटीपी प्रकल्पातील पाणी सक्तीचे

» पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक बांधकाम व्यावसायिक बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करत आहेत. त्यांना महापालिकेने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून (एसटीपी) शुद्ध केलेले पाणी वापरण्याची सक्ती केलेली आहे. मात्र, बांधकाम कमकुवत होण्याची भीती व्यावसायिकांकडून बोलली जात आहे. त्यामुळे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात शुद्ध पाण्याचा वापर न करता पिण्याच्या पाण्याचा वापर बांधकामांना केला जात असल्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

### पाण्याचा वापर काटकसरीने करण्याची सूचना

» पवना आणि आंद्रा धरणातील पाण्याचा साठा कमी होवू लागला आहे. पाटबंधारे विभागाने महापालिकेने पाण्याचा वापर काटकसरीने करण्याची सूचना केली आहे. त्यातच बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्याचे प्रमाण वाढले. मात्र, बांधकामासाठी 'एसटीपी'चे पाणी वापरण्याची सक्ती केली असता त्याकडे बांधकाम व्यावसायिक दुर्लक्ष करत आहेत. बांधकामासाठी एसटीपीचे पाणी उपलब्ध करण्यात येत आहे. तरीही पिण्याच्या पाण्याचा वापर बांधकामासाठी होऊ नये, अशा सूचना करण्यात येत आहे.

# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सव्वाचार हजार अतिक्रमणांवर कारवाई

## पीएमआरडीएची संयुक्त कारवाई, तिसऱ्या टप्प्यातील मोहीम सुरुच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून पुणे शहरासह परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्याच्या अनुषंगाने संयुक्तरित्या अतिक्रमणे काढण्यात येत आहे. या कारवाईचे दोन टप्पे पुर्ण झाले असून तिसऱ्या टप्प्यातील कारवाईत २६ मार्चपर्यंत सव्वाचार हजार अतिक्रमणे पाडण्यात आली आहेत.

संयुक्तरित्या सुरु असलेल्या या कारवाईत पीएमआरडीएसह पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण पोलीस, पीएमसी, पीसीएमसी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी, एमआयडीसी, एसएसईबी आदी विभागांमार्फत अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे यादरम्यान आतापर्यंत अनेक स्थानिकांनी स्वत:हून आपली अतिक्रमणे काढून घेतली आहे. सध्या तिसऱ्या टप्प्यात पुणे-सातारा रोड (नवले ब्रिज ते सारोळे), हडपसर (शेवाळवाडी) ते दिवे घाट, नवलाख उंब्रे ते चाकण, हिंजवडी परिसर - माण या रस्त्यासह महामार्गावर कारवाई प्रगतीपथावर आहे. यात १७ ते २६ मार्चपर्यंत ७५० अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई केली आहे. यात महामार्गासह राज्यमार्ग रस्त्यालगत असणाऱ्या दुकाने, पत्राशेड, गाळे, टपरी व अनधिकृत बांधकामे काढण्यात आली आहेत. चालू टप्प्यामध्ये पूर्वीचे पुणे नगर रस्त्यावरील शिक्रापूर ते शिरूर तसेच बावधन बु. ते एनडीए रोड येथील बकाजी कॉर्नर ते स्मशानभूमी या ठिकाणी संयुक्त कारवाई शुक्रवारपासून (दि. २८) करण्यात येणार आहे. संबंधित रस्त्यांवरील अतिक्रमणधारकांनी स्वत: अतिक्रमणे काढून घेत प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पीएमआरडीए आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे. यासह कोणतेही बांधकाम पूर्वपरवानगी घेऊनच करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

संबंधित कारवाई पीएमआरडीए आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलिस अधिक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह-आयुक्त डॉ. दिप्ती सुर्यवंशी-पाटील, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, वाहतुक विभागाचे उपआयुक्त बापू बांगर, कार्यकारी अभियंता शैलजा पाटील, कार्यकारी अभियंता सदानंद लिटके, तहसीलदार रविंद्र रांजणे, सचिन मस्के, पोलीस निरीक्षक महेशकुमार सरतापे आदी यंत्रणेच्या संयुक्तरित्या कारवाई करण्यात येत आहे



# पाचपट मोबदला मिळाला तरच रिंग रोडला जमीन

## कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीच्या मैदानात प्रशासन व स्थानिक शेतकरी यांच्यामध्ये प्राथमिक बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

जेवढी जमीन शासन वेगवेगळ्या विकास कामांसाठी घेईल त्या जमिनीचा मोबदला रेडी रेकनरच्या पाच पट मिळाला पाहिजे, असा आक्रमक पवित्रा घेत कदमवाकवस्ती येथील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे.

प्रारुप विकास योजनेतील 65 मीटर रुंद रस्त्यासाठी सन 2015 च्या नवीन भूसंपादन अधिनियमाद्वारे खासगी वाटाघाटीने थेट खरेदी करायच्या जमिनीच्या भूसंपादन प्रस्तावासंदर्भात कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील ग्रामपंचायतीच्या मैदानात प्रशासन व स्थानिक शेतकरी यांच्यामध्ये प्राथमिक बैठक पार पडली.

यावेळी शेतकऱ्यांनी वरील भूमिका घेतली. यावेळी पुणे भूसंपादन उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, भूसंपादन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अव्वल कारकून विद्या गायकवाड, सुरेखा काकडे, एकनाथ ढाके, मंडलाधिकारी योगिता गायकवाड, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता अरविंद माळी, वरिष्ठ अभियंता अमित हस्ते, तहसीलदार आशा होळकर, पुणे जिल्हा भूमी अभिलेखचे निरीक्षक जयसिंग गाडे, लिपिक रोहित चोपडे, भूकरमापक स्नेहा भिसे, मंडलाधिकारी लक्ष्मण बांडे आदी अधिकारी उपस्थित होते.

हा रिंग रोड हा 65 मीटरचा असून भावडी, लोहगाव, वाघोली, मांजरी खुर्द, कदमवाकवस्ती येथील रिव्हर व्ह्यू सिटीच्या जवळून पिराच्या मंदिरापासून फुरसुंगी व पुढे वडकीच्या दिशेने जाणार आहे. या रिंगरोडमध्ये कदमवाकवस्ती येथील शेतकऱ्यांची अंदाजे 17 एकर जमीन (67581. 54 चौरस मीटर) या रस्त्यामध्ये जाणार आहे. प्रशासनाला जमीन खरेदी करून क्षेत्र विकत घ्यायचे आहे.

यावेळी शेतकऱ्यांनी पुणे-सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरण, रिंग रोड, शिवरस्ता याबाबतच्या तक्रारी अधिकाऱ्यांना सांगितल्या. तसेच काही शेतकऱ्यांचे क्षेत्र रिंग रोडमध्ये गेले आहे. मात्र त्यांचे या यादीत नावे नाहीत.

मग त्यांना मोबदला मिळणार का ? यावेळी पीएमआरडीए व भूसंपादनाच्या अधिकाऱ्यांनी सूचनांची नोंद करून घेतली. यावेळी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष माधव काळभोर, हवेली पंचायत समितीचे माजी सभापती अनिल टिळेकर, उद्योजक बाळासाहेब भोसले, गणपत चावट, चित्तरंजन गायकवाड, कदमवाकवस्तीचे उपसरपंच नासिर पठाण, सदस्य आकाश काळभोर, माजी उपसरपंच ऋषिकेश काळभोर, उदय काळभोर, सुशील काळभोर, तुषार काळभोर, ग्रामविकास अधिकारी अमोल घोळवे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### शेतकऱ्याचा आक्रमक पवित्रा

» विकासाला आमचा विरोध नाही; मात्र जेवढी जमीन शासन वेगवेगळ्या विकास कामांसाठी घेईल त्या जमिनीचा मोबदला रेडी रेकनरच्या पाच पट मिळाला पाहिजे, असा आक्रमक पवित्रा घेत कदमवाकवस्ती येथील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे.

> वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी रिंग रोड तयार करण्यात येत आहे. यामध्ये कदमवाकवस्ती येथील अनेक शेतकऱ्यांचे क्षेत्र जात आहे. त्याचा प्राथमिक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी लोकहित व विकासासाठी क्षेत्र देऊन सहकार्य करावे. तसेच या क्षेत्राच्या बदल्यात शेतकऱ्यांना शासनाकडून रेडी रेकनरच्या अडीच पट मोबदला देण्यात येणार आहे.
>
> - कल्याण पांढरे, भूसंपादन उपजिल्हाधिकारी

> क्षेत्र देण्यासाठी आमची काहीही अडचण नाही. पण रेडी रेकनरच्या अडीच पट मोबदला आम्हाला मान्य नाही. जर शासनाने रेडी रेकनरच्या 5 पट मोबदला दिला, तरच आम्ही आमच्या जमिनी देऊ, अन्यथा आम्ही जमिनी देणार नाहीत.
>
> - गणपत चावट, शेतकरी

# हिंगणीबेर्डीत सामूहिक ड्रोन फवारणी, सूर्यफूलच्या दहा एकरांत प्रात्यक्षिक

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शेतकरी पारंपारिक शेतीला फाटा देत आधुनिक पद्धतीने शेती करण्याला प्राधान्य देत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

कृषी विभागाच्या वतीने सूर्यफूल पिकावर ड्रोनव्दारे औषध फवारणीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. कमी वेळात जास्त क्षेत्र व कमी पाणी, औषधांची बचत होत असल्याने हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय होत चालले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शेतकरी पारंपारिक शेतीला फाटा देत आधुनिक पद्धतीने शेती करण्याला प्राधान्य देत आहे. याचा प्रत्यय हिंगणीबेर्डी, जोतिबा नगर येथील शेतकऱ्यांनी सूर्यफूल पिकावरती सुमारे दहा एकर क्षेत्रावरती ड्रोनद्वारे औषध फवारणी प्रात्यक्षिक घेण्यात आले.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान व ड्रोन तंत्रज्ञान यामुळे पुढील काळात मोठा बदल शेती क्षेत्रामध्ये पाहायला येऊ शकतो. कमी वेळात जास्त क्षेत्र व पाणी व औषधाची बचत यामुळे लवकरच हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय होत चाललेला आहे. जास्त उंचीच्या दलदलीयुक्त व जिथे मनुष्य जाऊ शकत नाही, अशा ठिकाणी चांगल्या प्रकारे ड्रोन द्वारे फवारणी करता येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान व ड्रोन तंत्रज्ञान यामुळे पुढील काळात मोठा बदल शेती क्षेत्रामध्ये पाहायला येऊ शकतो. जास्त उंचीच्या दलदलीयुक्त व जिथे मनुष्य जाऊ शकत नाही अशा ठिकाणी चांगल्या प्रकारे ड्रोनद्वारे फवारणी करता येत आहे. प्रात्यक्षिकाचे आयोजन तालुका कृषी अधिकारी राहुल माने, मंडळ कृषी अधिकारी दिनेश फडतरे, कृषी पर्यवेक्षक शितल मगर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक शिवाजी कदम यांनी केले. सुनील ढवळे, ज्ञानेश्वर कतुरे, दत्तात्रय खोमणे, प्रफुल्ल कामठे, माऊली ढवळे, प्रशांत भोसले या शेतकऱ्यांनी सूर्यफूल पिकावर फवारणी केली आहे.



### ड्रोनद्वारे फवारणीचे फायदे किंवा वैशिष्ट्ये

- » आठ ते दहा मिनिटांत एकराची फवारणी
- » १० लिटर पाण्यात एकरची फवारणी
- » फवारणी करताना शेतकऱ्यांमध्ये होणारी विषबाधेपासून सुरक्षा
- » ४०% औषधात बचत
- » मजूर जास्त लागत नाहीत
- » मोठ्या पिकांना फवारणी करता येते
- » ऊस, सूर्यफूल, फळबाग, मका व इतर
- » भिजवलेले शेत, चिखलापासून मुक्ती

> सूर्यफूल पिकाची वाढ चांगली झाल्यामुळे त्याच्यामध्ये औषध मारणे कठीण जात आहे. कांदा, हरभरा, गहू पिकाच्या काढणीमुळे मजूरही सध्या उपलब्ध नसल्यामुळे आम्ही सूर्यफूल लागवड केलेली शेतकरी मिळून ड्रोन फवारणी करण्याचा निर्णय घेतला आहे.
>
> - प्रशांत भोसले, सूर्यफूल उत्पादक शेतकरी, हिंगणी बेर्डी.